# लीलावती रुग्णालयात दुहेरी वाल्व रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वी

मुंबई : मुंबईतील लीलावती रुग्णालयात मुंबईतील पहिले दुहेरी वाल्व रि-प्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडण्यात आली आहे. ह्दयाच्या झडपाचा आजार असलेल्या एका वृद्धावर नॉव्हेल व्हॅस्कुलर क्लोजर यंत्राद्वारे ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शस्त्रक्रियेमुळे वृद्धाला नव्याने आयुष्य मिळाले आ. लीलावती रुग्णालयातील इंटरव्हेंशनल स्ट्रक्चरल कार्डिओलॉजिस्ट डॉ. रविंदर सिंग राव, कार्डिओलॉजिस्ट डॉ. विद्या सुरतकल, डॉ. आनंद राव आणि ऍनेस्थेटिस्ट डॉ. नम्रता कोठारी यांनी एकत्रितपणे ही शस्त्रक्रिया यशस्वी केली आहे. कर्नाटकातील रहिवासी सुबोध मिश्रा (बदललेला नाव) यांना ह्दयाच्या झडपाचा आजार होता. १४ वर्षांपूर्वी त्यांच्यावर ओपनहार्ट शस्त्रक्रिया करण्यात आली होती. यावेळी महाधमनी आणि मिट्रल दोन्ही वाल्व बदलण्यात आले होते. परंतु प्रकृती बिघडू लागल्याने कुटुंबियांनी त्यांना लीलावती रुग्णालयात दाखल केले. लीलावती रुग्णालयातील इंटरव्हेंशनल स्ट्रक्चरल कार्डिओलॉजिस्ट डॉ. रविंदर सिंग राव म्हणाले की, ह्दयाची दोन्ही झडप एकाच वेळी बदलण्याची ही शस्त्रक्रिया आव्हानात्मक असते. परंतु, दोन्ही वॉल्व बदल्यावर रुग्णाला जास्तीत-जास्त फायदा होतो. फेमोरल धमनी मध्ये एक मोठे आवरण ठेवले होते. आवरणाद्वारे महाधमनी वॉल्व बदलण्यात आले.

